महाराष्ट्र टाइम्स, पुणे ■ बुधवार, १५ जून २०१६

# ‘एसपी कॉलेजचे ‘ते’ दिवस पुन्हा बहरू दे...’

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

जुन्या शाळेत वा कॉलेजमध्ये गेल्यानंतर भारावून न जाणारा विद्यार्थी तसा विरळाच. विद्यार्थी, मग तो सर्वसामान्य असो, की मग एखाद्या राज्याचा राज्यपाल, आपल्या हक्काच्या संस्थेच्या ‘त्या’ जुन्या आठवणी पुन्हा एकदा कुरवाळतो. नव्यांना त्यांचं महत्त्व सांगतो आणि पुन्हा एकदा ‘ते’ दिवस फुलविण्याच्या, तोच आनंद सगळ्यांना देण्याच्या गप्पाही करतो. असाच काहीसा अनुभव पुण्यात मंगळवारी अनुभवायला मिळाला. निमित्त होते ते पुणेकरांच्या लाडक्या एस. पी. कॉलेजच्या शताब्दीपूर्ती दिनाचे.

एस. पी. कॉलेजच्या लेडी रमाबाई हॉलमध्ये मंगळवारी त्यासाठी आयोजित विशेष कार्यक्रमात कॉलेजचे माजी विद्यार्थी आणि सिक्कीमचे राज्यपाल श्रीनिवास पाटील यांनी आपल्या कॉलेजविषयीच्या आठवणींना उजाळा दिला. कॉलेजविषयी कृतज्ञता व्यक्त करतानाच, आपण अनुभवलेला आनंद विद्यार्थ्यांच्या नव्या पिढीला देण्यासाठी माजी विद्यार्थ्यांच्या मदतीने कॉलेजला मदत करण्याची भावनाही त्यांनी बोलून दाखविली. शि. प्र. मंडळीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष अॅड. एस. के. जैन, प्राचार्य डॉ. दिलीप शेठ या वेळी व्यासपीठावर उपस्थित होते. कॉलेजच्या उभारणीसाठी मोलाची भूमिका बजावणाऱ्या टिळक आणि पंडित कुटुंबीयांचा संस्थेतर्फे या वेळी विशेष सन्मान करण्यात आला. कॉलेजच्या माजी विद्यार्थी संघटनेने पाटील यांचाही या वेळी सत्कार केला. कॉलेजचे माजी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा या वेळी सन्मान करण्यात आला.

पाटील यांनी या वेळी आपल्या कॉलेजविषयीच्या आठवणींना उजाळा देताना त्या वेळचे पुण्यातील वातावरण हलक्या फुलक्या किश्शांसह उपस्थितांसमोर मांडले. ते म्हणाले, ‘कॉलेजचा आम्ही पाहिलेला काळ नेहमी बहरलेला होता. त्यावेळी वेगळा आनंद मिळतं होता. आता परिसर उजाड झालाय. ज्या राज्यामध्ये मेघदूत येतात, असं म्हटलं जातं, त्या राज्यात सध्या मी असतो. कधी कधी त्या मेघदूतांना सांगावंस वाटतं, जाऊन बरस या परिसरात. हा परिसर पुन्हा बहरू देत.’ आपण त्या वेळी अनुभवेला ‘तो’ आनंद पुन्हा मिळावा, यासाठी सर्वांनीच प्रयत्न करण्याचे आवाहन करण्यास पाटील विसरले नाहीत. डॉ. शेठ यांनी प्रास्ताविक केले. डॉ. व्ही. एम. सोलापूरकर यांनी आभार मानले.





स्वप्नील शिंदे

एस. पी. कॉलेजच्या शताब्दीपूर्ती दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात कॉलेजचे माजी विद्यार्थी आणि सिक्कीमचे राज्यपाल श्रीनिवास पाटील यांनी आपल्या कॉलेजविषयीच्या आठवणींना उजाळा दिला. शि. प्र. मंडळीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष अॅड. एस. के. जैन, प्राचार्य डॉ. दिलीप शेठ या वेळी व्यासपीठावर उपस्थित होते. जुन्या काळातील कॉलेजच्या एका विद्यार्थ्याबरोबर मनमोकळेपणाने संवाद साधला.

## न झटकों ये जुल्फे, मोती टूट जायेंगे...

कॉलेजच्या शताब्दीपूर्तीचा हा कार्यक्रम उपस्थित प्रत्येकालाच कॉलेजच्या आठवणींमध्ये रमविणारा ठरला. आपल्या होस्टेलवरच्या आठवणी सांगताना पाटील म्हणाले, ‘आम्ही हॉस्टेलवर राहायचो, त्यावेळी काही ‘लोक’ सकाळी सकाळी टॉवेलला पीळ देत बाहेर पडायचे. केस असे मागे सारत पुन्हा दृष्टिआड व्हायचे. त्यावेळी आपोआपच शब्द फुटायचे, ‘न झटकों ये जुल्फे, मोती टूट जायेंगे...’ पाटील यांनी सांगितलेल्या वक्तव्याने उपस्थितांमध्ये हास्याची लकेर उमटली. रमाबाई हॉलच्या संदर्भाने पाटील म्हणाले, ‘हा पडदा जेव्हा सरकायचा, कुणीतरी ‘आपला’ हळूच हात देऊन छान असं सांगायचा, त्या वेळी जी मजा यायची, ती आता नाही. मोबाइलमुळे ती मजा गेली,’ असे म्हणून त्यांनी वस्तुस्थितीची सौम्य शब्दांमध्ये करून दिलेली जाणीवही टाळ्यांची दाद मिळवून गेली.